


नाथांच्या छत्रछायेत पर्वणी आत्मोन्नतीची!

दि. ६ ते १६ जानेवारी २०२७

कार्यक्रम स्थळ: नाथ शक्तिपीठ,
न्यू तापडिया नगर, खरप रोड, अकोला

संपर्क : डॉ. श्रीकांतशास्त्री गदाधर. ९८२२३६१९३१
प्रा. गजानन कुळकर्णी. ९७६७०७६९७६ नाथशक्तिपीठ ९१३००८०९३१
E-mail : nathshaktipeeth@gmail.com Website : www.nathshaktipeeth.org

नाथांच्या छत्रछायेत पर्वणी आत्मोन्नतीची!

आमची नाथ परंपरा

नाथपंथाची निर्मिती ही कलियुगातील निर्माण झालेले दोष दूर करण्यासाठी आणि सज्जनशक्तीला आधार देण्यासाठी भगवान ब्रह्मा, विष्णू, महेशांनी सर्व दैवी शक्तींसमोर केली. भगवान श्रीदत्तात्रेय हे ब्रह्मांडाचे गुरु आणि नाथपंथाचे आराध्य दैवत आहेत.

- चैतन्य श्री आदिनाथ
- चैतन्य भगवान दत्तात्रेय
- चैतन्य श्री मच्छिंद्रनाथ
- चैतन्य श्री गोरक्षनाथ
- चैतन्य श्री गहनीनाथ
- चैतन्य श्री निवृत्तीनाथ
- चैतन्य श्री ज्ञाननाथ (ज्ञानेश्वर माउली)
- चैतन्य श्री सत्यमलनाथ
- चैतन्य श्री गुप्तनाथ
- चैतन्य श्री परमहंसजी
- चैतन्य श्री ब्रह्मानंद
- चैतन्य श्री परमानंद
- चैतन्य श्री काशीनाथ
- चैतन्य श्री विठ्ठलनाथ
- चैतन्य श्री विश्वनाथ
- चैतन्य श्री माधवनाथ (१८५७ ते १९३६)

✷ चैतन्य श्री व्यंकटनाथ महाराज (१९०४ ते १९९३) ✷

१९९३ च्या महाशिवरात्रीला श्री समर्थ योगाभ्यानंद व्यंकटनाथ महाराजांनी समाधी घेतली.

त्यांची आज्ञा व पूर्ण कृपेने

समर्थ सद्गुरु श्रीनरेन्द्रनाथ महाराज

हे गुरुकार्य करीत आहेत.

ओम एज्युकेशन सोसायटी

ओम एज्युकेशन सोसायटी, अकोला ही एक पंजीकृत संस्था असून सोसायटी जि. ॲक्ट १८६० अंतर्गत तिचे पंजीकरण झाले आहे.
(महा/१९१०/अकोला/१९८८) संस्थेचा पंजीयन क्रमांक F/१९९१ ८ डिसें. १९८८

ओम एज्युकेशन सोसायटीच्या कार्याचे संचालन पुढीलप्रमाणे

नाथशक्तिपीठ	–	आध्यात्मिक चळवळीचे उर्जा केन्द्र.
वैदिक उपचार केंद्र	–	वैदिक उपचारांद्वारे आधिव्याधींचे निरसन.
श्री प्रल्हादाश्रम चतुर्वेद पाठशाळा	–	ऋग्वेद, शुक्ल यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेदाचे शिक्षण व वैदिक संशोधन.
यज्ञेश्वर ज्ञानोपासक विश्वविद्यालय	–	भारतीय प्राचीन कला व विद्यांच्या प्रसार-प्रचारासाठी कार्यरत.
गोसेवा व गोसंवर्धन	–	देशी गोवंशाचे संरक्षण-संवर्धन व पूजन.

चैतन्य सद्गुरु योगाभ्यानंद श्री माधवनाथ महाराज



मल्हारदादा व मथुराबाई या धर्मपरायण दाम्पत्याच्या पोटी माधवनाथांचा १८५६ च्या गुढी पाडव्यास जन्म झाला. गर्भावस्थेतील मथुराबाईंना उज्जैनीस एका साधूने तुम्हास अवतारी पुरूष पुत्र म्हणून प्राप्त होईल असा आशीर्वाद दिला. बाल वयातील माधवास पाहताच संत देव मामलेदार यांनी भविष्यात हा बालक नाथ पंथाच्या मोठ्या गादीचा मालक होईल अशी भविष्यवाणी केली होती. चित्रकूट येथील नाथ परंपरेच्या गादीवर वयाच्या १०व्या वर्षी गुढी पाडव्याच्या दिवशी माधवनाथ नाथगुरू म्हणून विराजमान झाले. ही पंथाचीच पूर्व योजना होती. पुढील १२ वर्ष त्यांनी हिमालयात साधना केली आणि पंथ कार्याला सुरुवात केली. चित्रकूटच्या या पारंपरिक स्थानामध्ये बदलाचे स्पष्ट संकेत मिळताच माधवनाथांनी चित्रकूटचा त्याग केला. गिरीच्या बालाजींनी त्यांना साधू अवस्थेत दर्शन देऊन बालाजीची मूर्ती प्रसाद म्हणून दिली. फिरता-फिरता माधवनाथ संभाजीनगर जिल्ह्यातील देवगाव रंगारीस आले आणि व्यंकटेश मंदिराची स्थापना केली. माधवनाथांनी चित्रकूटचे नाथ पंथाचे पारंपरिक माहात्म्य देवगाव रंगारी येथे आकाश मार्गाने आणले. पुढील ३४ वर्ष देवगाव येथून पंथकार्य केले. माधवनाथांनी बालवयापासूनच व्यंकटनाथांना आपला पुढील उत्तराधिकारी म्हणून घडविण्यास सुरुवात केली. माधवनाथांनी व्यंकटनाथांना अंदाजे १२व्या वर्षी प्रारंभी हिमालयामध्ये व नंतर श्रीक्षेत्र गाणगापूर येथील संगमावर खडतर तपश्चर्येसाठी पाठविले. माधवनाथांनी महासमाधी घेण्यापूर्वी आपली आत्मज्योत श्री व्यंकटनाथांमध्ये विलीन केली आणि त्यांना नाथ पंथाच्या अखंड गुरुपरंपरेचा कार्यभार सोपविला.

माधवनाथ महाराजांचे पूर्ण चरित्र वाचण्यासाठी पहा :-

योगेश्वरानंदांच्या छायेत. लेखक : श्री नरेन्द्रनाथ महाराज M.Com. F.C.A.

चैतन्य सद्गुरु योगाभ्यानंद श्री व्यंकटनाथ महाराज



सद्गुरु माधवनाथांच्या सेवेत वयाच्या ७व्या वर्षापासूनच व्यंकटनाथ महाराज समर्पित झाले. बाल वयातच त्यांचे षड्चक्र जागृत करून भगवान दत्तात्रेय व रेणुका मातेने त्यांना आशीर्वाद दिले. माधवनाथांनी त्यांना हिमालयामध्ये खडतर तपश्चर्येसाठी पाठविले. अनेक ऋषिमुनी व योगींकडून त्यांनी योग विज्ञान, आयुर्वेद, ज्योतिष, नक्षत्र यांचा अभ्यास आत्मसात केला. भगवान दत्तात्रेय त्यांच्याशी नानाविध रूपात येऊन त्यांच्याशी हितगुज साधत. शिष्याला दत्त दर्शन घडविणे, नदीच्या पूरातून कार चालविणे, मृत्यू पुढे ढकलणे, श्री दत्तांना इच्छा भोजन देणे, जन्मापूर्वीच जन्म पत्रिका देणे, एकाच वेळी ४ जणांच्या घरी उपस्थित असणे, योग सामर्थ्याने आकाश मार्गाने इच्छित स्थळी जाणे अशा अनेक अघटित लीला त्यांनी लीलया साकार केल्या. नाथपंथाची विभूती, मच्छिंद्रनाथांची कंथा-झोळी याचे दर्शन केले. नाथपंथाचे विभूती माहात्म्य सर्वांपर्यंत पोहोचविले. नाथ पंथाच्या प्रचार आणि प्रसारासाठी विविध ठिकाणी हवन व याग संपन्न केले. अहंकार बाजूला ठेऊन विवेकी व्हा ही त्यांची शिकवण आहे. समाधी घेण्यापूर्वी त्यांनी पुढील कार्याची आज्ञा नरेन्द्रनाथ महाराजांना दिली. दत्तात्रेयांनी नरेन्द्रनाथांना दिलेली रूद्राक्षाची माळ स्वतः जवळच्या पोवळ्यांचे मणी आणि मोठा रूद्राक्ष प्रसाद म्हणून दिला आणि आपल्या पुढील कार्याचा उत्तराधिकारी म्हणून नरेन्द्रनाथ महाराजांना पंथ कार्याची आज्ञा दिली.

१९९३ साली महाशिवरात्रीच्या दिवशी व्यंकटनाथ महाराजांनी महासमाधी घेतली.

व्यंकटनाथ महाराजांचे पूर्ण चरित्र वाचण्यासाठी पहा :-

योगेश्वरानंदांच्या छायेत. लेखक : श्री नरेन्द्रनाथ महाराज M.Com. F.C.A.

नाथांच्या छत्रछायेत पर्वणी आत्मोन्नतीची!

नाथशक्तिपीठाधीश अध्यात्मयोग महर्षि प.पू. श्री नरेन्द्रनाथ महाराज



कलियुगाच्या या संमिश्र कालखंडात, जिथे भौतिक सुखांची रेलचेल असूनही मानवी मन अस्वस्थ आहे, तिथे अध्यात्माची एक जाज्वल्य ज्योत अकोल्याच्या भूमीवर प्रज्वलित आहे. ती ज्योत म्हणजे प.पू. सद्गुरु श्री नरेंद्रनाथ महाराज स्थापित 'श्री नाथशक्तिपीठ' हे केवळ एक आध्यात्मिक केंद्र नसून, विज्ञानाला अध्यात्माची जोड देणारे 'अनुसंधान केंद्र' आणि भारतीय प्राचीन संस्कृतीचे 'पुनरुज्जीवन केंद्र' म्हणून ओळखले जाते. प.पू. सद्गुरु श्री नरेंद्रनाथ महाराज यांच्या अथक प्रयत्नातून आणि प.पू. व्यंकटनाथ महाराजांच्या आशीर्वादाने हे शक्तिपीठ आज जागतिक स्तरावर नावारूपास आले आहे.

नाथपंथाची अजरामर परंपरा : आदिनाथांपासून आजपर्यंत भारतीय आध्यात्मिक परंपरेत नाथ पंथाचे स्थान सर्वोच्च आहे. नाथपंथास सर्व संप्रदाय गुरुस्थानी मानतात. 'चैतन्य श्री मच्छिंद्रनाथां'पासून सुरू झालेली ही गुरु-शिष्य परंपरा आजही अविरतपणे सुरू आहे. मच्छिंद्रनाथ ते गहिनीनाथांपर्यंत हा पंथ प्रामुख्याने प्रखर हठयोग्यांचा होता. मात्र, संत ज्ञानेश्वर माऊलींनी या हठयोगाला 'भक्ती'ची प्रेमळ जोड दिली आणि त्याचे स्वरूप लोकाभिमुख केले. नाथ पंथाचा मुख्य उद्देशच हा आहे की, समाजातील सज्जन शक्तीचे संघटन करणे आणि जीवाच्या आध्यात्मिक विकासात मार्गदर्शकाची भूमिका बजावणे. याच महान परंपरेत १४ वे नाथगुरु योगाभ्यानंद श्री माधवनाथ महाराज आणि १५ वे नाथगुरु देवगाव रंगारीचे योगाभ्यानंद श्री व्यंकटनाथ महाराज झाले. त्यांच्याच आज्ञेने अकोल्यात एका नवीन क्रांतीचा जन्म झाला.

अध्यात्मयोग महर्षी प.पू. श्री नरेंद्रनाथ महाराज :- एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व नाथशक्तिपीठाचे पीठाधीश प.पू. श्री नरेंद्रनाथ महाराज हे आधुनिक काळातील एक ऋषीच आहेत. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे उच्च शिक्षण आणि आध्यात्मिक अधिकार यांचा समन्वय.

व्यावसायिक पार्श्वभूमी :- महाराज अकोला जिल्ह्यातील पहिले चार्टर्ड अकाऊंटंट आहेत. त्यांनी एम.कॉम, एफ.सीए. पर्यंत शिक्षण घेतले असून ८० च्या दशकात त्यांनी अकोल्यात संगणक शिक्षणाची

मुहूर्तमेढ रोवली होती.

सद्गुरु सेवा :- आपल्या व्यवसायासोबतच त्यांनी प.पू. व्यंकटनाथ महाराजांच्या चरणी ४० वर्षे अखंड शरणागत भावाने सेवा केली. वेदमंत्रांच्या माध्यमातून भाग्याचे पुनरुज्जीवन हे त्यांचे ब्रीदवाक्य त्यांच्या सखोल वैदिक ज्ञानाची साक्ष देते.

विज्ञानाला अध्यात्माची जोड :- प.पू. नरेंद्रनाथ महाराजांनी मांडलेली 'वेदमंत्रांचा दैनंदिन जीवनात उपयोग' (अप्लाइड वेदाज) ही संकल्पना म्हणजे प्राचीन वैदिक ऋषींचे ज्ञान आणि आधुनिक विज्ञानाचा एक अद्भुत संगम आहे. महाराजांच्या मते, वेद हे केवळ पठण करण्यासाठी नसून ते मानवी जीवनातील दुःख, व्याधी आणि कठीण प्रसंगांवर मात करण्यासाठी वापरले जाणारे एक 'प्रगत विज्ञान' आहे. त्यांनी वेदांतील विशिष्ट मंत्रांच्या ध्वनिलहरींचा निसर्ग, मानवी शरीर आणि मनावर होणारा परिणाम अभ्यासून, त्याद्वारे दुर्धर आजारांवर उपचार आणि मनोबलात वाढ करण्याचे तंत्र विकसित केले.

विज्ञानातील योगदानासाठी ओळखले जाणारे 'परम' महासंगणकाचे जनक डॉ. विजय भटकर यांनी महाराजांच्या या कार्याची विशेष दखल घेतली आहे. डॉ. भटकर यांच्या मते, महाराजांनी वेदांतील मंत्रांचा उपयोग ज्या तार्किक आणि प्रायोगिक पद्धतीने केला आहे, ते आधुनिक संशोधकांसाठी दिशादर्शक आहे. अध्यात्माला प्रयोगशाळेतील विज्ञानाइतकेच अचूक बनवणाऱ्या या संकल्पनेमुळेच त्यांना विद्वत् परिषदेकडून गौरविण्यात आले आहे.

संशोधनात्मक कार्य :- महाराजांनी अध्यात्माला केवळ पोथी-पुराणापुरते मर्यादित ठेवले नाही. त्यांनी वेदांतील निखळ वैज्ञानिक मंत्रांचा शोध घेऊन त्यांचा उपयोग दुर्धर व्याधींवरील उपचारांसाठी कसा करता येईल, यावर संशोधन केले आहे.


लोकोपयोगी साहित्य निर्मिती :- नाथपंथाच्या अभ्यासकांसाठी संदर्भग्रंथ म्हणून 'योगेश्वरानंदांच्या छायेत', जनसामान्यांना भेडसावणाऱ्या ऐहिक आणि परमार्थिक अडचणींवर मात करण्यासाठी 'हा खेळ प्राक्तनाचा की पूर्वसंचिताचा', साधकांसाठी 'आत्मोन्नती' व नवनाथ भक्तिसारातील गूढ संकल्पना सोप्या भाषेत उकलून दाखविण्यासाठी 'नवनाथबोधामृत' अशा चार ग्रंथांची श्रीनरेंद्रनाथ महाराजांनी निर्मिती केली आहे.


जागतिक स्तरावर दखल आणि सन्मान :- नाथशक्तिपीठाच्या कार्याची दखल जगातील नामवंत शास्त्रज्ञांनी आणि जगद्गुरुंनी घेतली आहे. 'परम' संगणकाचे जनक पद्मभूषण डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड (एमआयटी, पुणे), डॉ. आर. एन. शुक्ला यांसारख्या शास्त्रज्ञांनी पीठास भेट देऊन येथील उर्जेचे आणि कार्याचे कौतुक केले आहे. एमआयटी विद्वत परिषदेने महाराजांना 'अध्यात्मयोग महर्षि' ही उपाधी बहाल केली आहे.


जगद्गुरुंचा आशीर्वाद :- शृंगेरी, करवीर, हंपी आणि कांची कामकोटीचे जगद्गुरु शंकराचार्य स्वामी महाराज आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रविशंकर यांनीही पीठाच्या कार्याचा गौरव केला आहे. हिमालय तथा संपूर्ण भारतातून अनेक साधू सत्पुरुष ह्यांनी नाथशक्तिपीठाला भेट देऊन येथील आध्यात्मिक कार्याचा, तेजोलहरी तथा आभामंडलाचा अनुभव घेतला आहे.

प.पू. नरेंद्रनाथमहाराज (M.Com, F.C.A.) यांची ग्रंथसंपदा









हा खेळ प्राक्तनाचा की पूर्व संचिताचा

जीवनातील खडतर योग, कधीही न बदलणारे प्रारब्ध, वेदमंत्रांच्या माध्यमातून ,उपासनेच्या आधाराने तसेच ज्योतिष शास्त्रांच्या सहाय्याने कसे बदलता येतील ,हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय आहे. जीव कसा घडतो. आत्म्यावर कर्माच्या संस्कार कसे होतात. ब्रह्मांडांचे व्यवस्थापन. पंचमहाभूतांचा जीवनप्रवाहाची असणारा संबंध. कर्म दोष, नशीब आणि प्रारब्ध म्हणजे काय ? ते कसे बदलू शकते. वेद विज्ञानाची मानवी जीवनातील आवश्यकता याचेही सविस्तर वर्णन या ग्रंथात आहे. हा ग्रंथ अनेक मान्यवर ज्योतिषी आपल्या संदर्भांसाठी व नित्य अभ्यासासाठी संग्रही ठेवतात.

नवनाथ बोधामृत

मालुकवी विरचित नवनाथ भक्तिसार हा अति श्रेष्ठ, अद्भुत, परम पावन, मनाला गुंगवून ठेवणारा एक प्रासादिक ग्रंथ आहे. भगवान चैतन्य श्री मच्छिंद्रनाथांपासून सुरू झालेल्या नवनाथांच्या अद्भुत कार्याचे या ग्रंथामध्ये वर्णन या ग्रंथामध्ये आहे. या ग्रंथामधील गुढतेची उकल करून अध्यात्म योग महर्षि नाथ शक्तिपीठाधीश प.पू. श्री नरेंद्रनाथ महाराज एम.कॉम. एफ.सी.ए. यांनी जीवनामध्ये नाथपंथाच्या तत्त्व प्रणालीचा लाभ कसा घेता येईल यावर नवनाथ बोधामृतातुन सविस्तर भाष्य केल आहे. स्वतः ब्रह्मा विष्णू महेश यांनी या पंथाची योजना केली म्हणजेच विधात्याने हा पंथ निर्माण केला आहे. सध्याच्या कलियुगात हा पंथ आपल्याला भक्तिमार्गाकडे नेऊन आपली उन्नती कशी करू शकतो या विषयी ग्रंथात मार्गदर्शन केल आहे.

योगेश्वरानंदांच्या छायेत

नाथपंथाची योजना ही कलियुगासाठी आहे. जो पर्यंत कलियुग आहे ,तो पर्यंत नाथपंथ कार्यरत राहील. पंथ स्थापनेपासून म्हणजे चैतन्य श्री मच्छिंद्रनाथांपासुन सुरू झालेला हा पंथ आजही तितक्याच प्रखर सिद्धतेने कसा कार्य करत आहे , पंथामध्ये वेशभूषा , केशभूषा ,भाषा, पेहराव यामध्ये कसे स्थित्यंतर होत गेले, हठ्योगीयांच्या या पंथास भक्तिमार्गाचे कसे वळण लागले याचे सविस्तर वर्णन या ग्रंथात आहे. ग्रंथाची मांडणी सहा खंडामध्ये करण्यात आली आहे. पहिल्या भागात नाथपंथाची निर्मिती व कार्यकाळ, दुसऱ्या भागात नवनारायण नंतरचा कार्यकाळ, तिसऱ्या भागात माधवनाथांचा कार्यकाळ, चौथ्या भागात व्यंकटनाथांचा कार्यकाळ, पाचव्या भागात नरेंद्रनाथांचा कार्यकाळ आणि सहाव्या भागात शिष्यांचे मनोगत आणि त्यांना आलेल्या अनुभूती आहेत.

आत्मोन्नती

आत्मोन्नती साधना ही कोणत्याही दैवतेची उपासना नाही. या साधनेत कोणत्याही देवाचे मंत्र, स्तोत्र व अन्य काहीही उपचार करण्यास सांगितलेले नाहीत. माणूस जन्माला आल्यावर जे काही त्रास, क्लेश, दुःख, अपयश त्याच्या जीवनाच्या कालावधीत असतील त्यात बदल करण्यासाठी ही उपासना आहे. माणूस जन्माला आल्यावर त्याचा आत्मा विकसित होऊन तो परमात्म्याशी विलीन होण्या योग्य पात्र व्हावा यासाठी ही उपासना आहे. ही उपासना जसजशी कराल तसे कर्म बलवत्तर होऊन त्याच्या आत्म्याची उन्नती होईल. त्याचे जीवनात आनंद, उत्साह, कार्यक्षमता वाढेल. या उपासनेन मन शांत होईल. विवेक वाढेल. बुद्धी स्थिर होईल. आत्मबल उन्नत होईल. मानवी जीव हा पंचमहाभूतांचा आहे. त्या जीवावर होणारे पंच महाभूतांचे दुष्परिणाम या उपासनेन टळतील. षड्रिपु शांत होतील. चांगल्या गुणांचा विकास होऊन त्याचे प्रारब्ध पूर्वसंचित बदलण्यासाठी तो अनुभव घेऊ शकेल. तसेच अनेक डॉक्टरांनी आत्मोन्नतीच्या उपासनेमुळे निदान व उपचार पद्धतीत लक्षणीय सुधारणा झाल्याची अनुभूती कथन केली आहे.

श्रीनाथशक्तिपीठातील वेदकार्य



नाथशक्तिपीठ येथे श्री प्रह्लादाश्रम चतुर्वेद पाठशाळेची पहिली शाखा दिनांक ११जुलै १९९७ रोजी येथे सुरू झाली. प्रखर सामर्थ्यशाली व स्वयंसिद्ध अशा नवनाथ परंपरेतील नाथ शक्तिपीठाने वेद आपल्या कार्याचे अधिष्ठान मानले आहेत. वेद मंत्रांच्या माध्यमातुन भाग्याच पुनरूज्जीवन हे नाथशक्तिपीठाचे ब्रीद आहे. नाथ शक्तिपीठाधीश अध्यात्मयोग महर्षि प.पू. श्री नरेंद्रनाथ महाराजांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनात गेल्या चार दशकांपासुन नवनाथ परंपरेतील जाज्वल्य पीठ असलेल अकोला नाथ शक्तिपीठ वेद या सर्वोच्च धर्मज्ञानाचा प्रसार प्रचार करीत आहे. वेद पाठशाळेच्या शुक्ल यजुर्वेदाची दुसरी शाखा श्री दत्त मंदिर संस्थान जुने शहर अकोला येथे दिनांक १३ जुन २०२५ रोजी सुरू झाली आहे. तसेच नाथशक्तिपीठामध्ये सामवेदाची तिसरी शाखा दि. २९ जुलै, २०२६ रोजी सुरु करण्यात आली आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, पौरोहित्य, नारदीय कीर्तन, संगीत या सोबतच विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमही शिकवला जातो. नाथशक्तिपीठामध्ये १२ संगणकांची सुसज्ज प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना संगणक स्नेही बनविते. दोन्ही पाठशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रयोगशील व उपक्रमांवर विशेष भर दिला जातो. आजवर ४५० विद्यार्थी दीक्षित होऊन सुदूर महाराष्ट्रात धर्मकार्या सोबत नैतिक प्रबोधनाचे कार्य करीत आहे.

अतिसौरी महायाग







मच्छिंद्रनाथांपासून अखंड गुरुपरंपरेने चालत आलेले विश्वकल्याणार्थ नाथपंथाचे कार्य विदर्भातील नाथशक्तिपीठ अकोला येथून अविरतपणे सुरू आहे. ''जिथे जिथे रविकिरण पोहोचतात तेथील सजीव सृष्टी सुखी संपन्न व निरामय राहावी, पर्यावरणाचे संतुलन राहावे, विश्वबंधुत्व दृढ व्हावे, सज्जनशक्तीचे संघटन बलशाली व्हावे,'' असा नाथशक्तिपीठाधीश अध्यात्मयोग महर्षि प.पू. श्री नरेन्द्रनाथ महाराजांचा संकल्प आहे. या संकल्पाच्या पूर्तीसाठी पुढील अनुष्ठान व हवनाचे आयोजन केले आहे.

नाथपंथ प्रचार, प्रसार व विश्वकल्याणार्थ महाराष्ट्रातील अकोला येथील पवित्र भूमीवर दिनांक ६ जानेवारी २०२७ ते १६ जानेवारी २०२७ या पावन पर्वावर श्रीनवनाथ भक्तिसार, श्रीगुरूचरित्र, ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरी आणि ग्रंथराज श्रीदासबोध या ग्रंथांचे सामूहिक पारायण व नाथपंथीय हवनाचे आयोजन अकोला येथील नाथशक्तिपीठात करण्यात आले आहे. या महायागाच्या निमित्ताने अतिसौरी, अतिरुद्र, पावमानी, सप्तशती अयुतचंडी, गणपती अथर्वशीर्ष, नृसिंह कवच, दत्तमाला मंत्र, दत्तगायत्री, बीजमंत्र, दत्तात्रय वज्रकवच, दत्तगोरक्ष कवच, नवनाथ गायत्री, हनुमान कवच, शाबरी कवच, १४ प्रणवयुक्त महामृत्युंजय मंत्र, चैतन्य श्रीव्यंकटनाथ महाराजांच्या नाममंत्राचे (जपसंख्या १५ कोटी) आणि नवग्रह आदि देवतांच्या मंत्राप्रीत्यर्थ अनुष्ठानपूर्वक हवन होईल.

या दरम्यान पूज्यपाद श्रीमद्जगद्गुरु श्रीशंकराचार्य स्वामीमहाराजांचे, यतींचे तसेच संतांच्या मांदियाळींचे पूजन, कीर्तन, प्रवचन, भजन व लक्ष अन्नदानाचा संकल्प करण्यात आला आहे.

दरम्यान महाराष्ट्रातील २५० हून अधिक देवस्थानांचे विश्वस्त, क्षेत्रोपाध्याय, अर्चक, वैदिक, याज्ञिक, भागवतकार, कीर्तनकार, प्रवचनकार, प्रबोधनकारांच्या कार्याचा यथोचित गौरव करण्यात येईल.

प.पू.श्री.नरेंद्रनाथ महाराज हवन करीत असताना पवित्र अग्निज्वालांमधून आवाहित देवता आपल्या अस्तित्वाची साक्ष देतात. ही नाथपंथाच्या गुरुपरंपरेची सिद्धता आणि सामर्थ्य आहे.

आदित्यस्य नमस्कारान् ये कुर्वन्ती दिने दिने। जन्मांतर सहस्रेषु दारिद्र्यं नोपजायते।।



सूर्याला केवळ नित्य नमस्कार करणाऱ्या साधकाला जन्मोजन्मी दारिद्र्य येतच नाही. सूर्याकडून आरोग्याची कामना करावी असे शास्त्र सांगते. सूर्योपासनेमुळे साधकाला शिस्त लागते.

सौरसूक्त म्हणून वेदमंत्रांचा एक मंत्रसमुच्चय आहे. ह्या मंत्रांच्या योग्य पठणाने बल, बुद्धी, चातुर्य, धनधान्य, संपत्ती, शारीरिक व मानसिक आरोग्य आदी गोष्टींचा लाभ होतो. जीवन सुखकर होते. शत्रू निष्प्रभ होतात. संकल्पित हवन केले तर केलेल्या पाठाला सिद्धता येते. ह्या हवनाने कॅन्सर, चर्मरोग, नेत्ररोग, हृदयरोग, मानसिक विकार यासारखे भयंकर रोग बरे झाल्याची इतिहासात उदाहरणं आहेत. नाथपंथाचे यज्ञयागादी कर्म अनादी कालापासून अखण्डपणे सुरू आहे. श्री समर्थ माधवनाथांनी, श्रीव्यंकटनाथांनी तसेच श्रीनरेंद्रनाथांनी आपल्या जीवनात ते शिस्तबद्धपणे केले. नाथपंथामध्ये सुरू असलेल्या अखंड सूर्योपासनेच्या सिद्धतेची अनुभूती आज सर्वजण नाथ शक्तिपीठाच्या माध्यमातून घेत आहेत. अकोला नाथ शक्तिपीठात सौरसूक्ताच्या २१ हजार पाठांचे अनुष्ठान संपन्न झाले आहे. त्याप्रीत्यर्थ दशांश हवन या कालावधीत होईल.

तव तत्त्वं न जानामि किदृशोसि महेश्वर। यादृशोसि महादेव तादृशाय नमो नमः।।



हे महादेवा! तुझे निज स्वरूप मी जाणू शकत नाही, पण तू ज्या स्वरूपात व्यापलेला आहे त्या स्वरूपाला माझा नमस्कार असो.

महादेवाच्या उग्र शक्तीचे वर्णन वेदाने केले आहे. रुद्रसूक्तामधून ते आपल्याला पाहावयास मिळेल. महादेवाच्या अतिपराकाष्ठेच्या उग्र शक्तीला क्रूर म्हणून संबोधिले आहे. ह्याचे सर्व वर्णन रुद्रामध्ये आहे. क्रूरता म्हणजे निर्दयता नव्हे, तर शत्रूला रडविणारा ह्या अर्थाने आहे. आपल्या भक्ताला जो त्रास देतो त्या भक्तांच्या शत्रूला रडायला लावणारा व अती भयावह वाटणारा रुद्र आहे. जीवनातील सर्व प्रकारच्या सुखशांतीसाठी, आरोग्यासाठी व आत्मोन्नतीसाठी योग्य संकल्पित रुद्राची योजना करतात.

रुद्राचे हवन उपासकाला जीवन देणारे आहे. हा मृत्युंजय रुद्र आहे. हा त्वरित लाभ देणारा रुद्र आहे. रुद्राच्या पठनाने व श्रवणाने गतजन्माचे पाप नाहीसे होऊन माणसाला सर्व प्रकारचे ऐश्वर्य प्राप्त होते. धर्मशास्त्राप्रमाणे सर्वात लवकर प्रसन्न होणारी देवता म्हणजे रुद्र होय. म्हणूनच महादेवाला आशुतोष व भोलेनाथ असेही म्हणतात. अकोल्याच्या श्रीनाथशक्तिपीठात १५ हजार रुद्रपाठ व ११ लाख १४ प्रणवयुक्त महामृत्युंजय मंत्राचा जप झाला आहे. त्याप्रीत्यर्थ दशांश हवन या कालावधीत संपन्न होईल.

सर्वा बाधा विनिर्मुक्तो धनधान्य समन्वितः। मनुष्यो मत्प्रसादेन भविष्यति न संशयः।।



माझ्या कृपेने व प्रसादाने मनुष्य सर्व प्रकारच्या संकटातून मुक्त होऊन धनधान्य व पुत्रपौत्रांनी युक्त होतो हे निःसंशय आहे, असे मार्कंडेय पुराणात देवीने स्वतः सांगितले आहे. देवीचे हे प्रासादिक वचन लक्षात घेऊन सप्तशतीचे सहस्रचंडी विधिपूर्वक संकल्पित पाठ केले आहेत. कलियुगामध्ये देवीची उपासना विशेष फलदायी आहे. सप्तशतीच्या हवनाचे वेळी सुमधुर, रसाळ व प्रासादिक असे महिषासुरमर्दिनीचे स्तोत्र म्हणून देवीला आहुती देवून तिचे कृपाशीर्वाद घेण्यात येणार आहेत. 'श्रुतं हरती पापानि तथाऽरोग्यं प्रयच्छती।' या स्वतः देवीच्या वचनाप्रमाणे सप्तशतीच्या केवळ श्रवणाने सकल पापे नष्ट होऊन आयुष्य, आरोग्याची प्राप्ती होते. अतिसौरी यागामध्ये सप्तशती पाठाचे प्रीत्यर्थ हवन होणार आहे. तसेच नाथपंथाच्या शाबरी देवी कवचाच्या १२ हजार पाठांचे प्रीत्यर्थ हवन होणार आहे.



गणपती अथर्वशीर्ष

प्रत्येक कार्य निर्विघ्नतेने पार पाडण्यासाठी गणपतीची कृपा आशीर्वाद आवश्यक आहे. त्याच्या उपासनेने नित्य अजाणत्या पापांचा नाश होतो. यश, कीर्ती, विद्या, बुद्धी, इच्छित फलप्राप्ती व सकल कार्यसिद्धी होते. गणेशाच्या कृपेसाठी अथर्वशीर्षाचे २१ हजार पाठ करून त्याप्रीत्यर्थ हवन होईल.

उग्रं वीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतो मुखम्। नृसिंहं भीषणं भद्रं मृत्यु मृत्युं नमाम्यहम्।।



सकल प्राणिमात्राचे पालन पोषण व समस्त पितरांना गती देण्याचे कार्य महाविष्णूंचे आहे. वेदांतील पुरुषसूक्त, पवमान, विष्णुसूक्तामध्ये श्रीविष्णूंची स्तुती केली आहे. पवमान हे अतिशय प्रभावी व प्रासादिक सूक्त आहे. ह्या सूक्ताने सगळ्या प्रकारच्या पापांचे क्षालन होते. लक्ष्मीप्राप्ती व उत्तम कुळात जन्मप्राप्ती होते. विष्णूची कृपा संपादन केली जाते. ह्या मंत्रांचे जप फळ म्हणजे खडतर योग, अपमृत्यू व मृत्यूभय नाहीसे होते.

अकोला श्रीनाथशक्तिपीठामध्ये पंचसूक्त पवमानाचे १६०० पाठ व भगवान श्रीनृसिंहाच्या नृसिंह वज्रपंजरी स्तोत्राचे १२००० पाठ केले आहे. अतिशय शक्तिशाली व भक्तांचे रक्षण करणाऱ्या सामर्थ्यशाली पाठ व सूक्ताचे प्रीत्यर्थ हवन करण्यात येईल.



यज्ञभोक्त्रेच यज्ञाय यज्ञरूप धराय च। यज्ञप्रियाय सिद्धाय दत्तात्रेय नमोस्तुते।।



ब्रह्मा विष्णु महेश स्वरूपी भगवान दत्तात्रेयांच्या यज्ञरूपाचे वर्णन वरील श्लोकात केले आहे. श्रीदत्त केवळ स्मरणाने संतुष्ट होऊन भक्तांच्या मनोकामना पूर्ण करतात. असे भगवान दत्तात्रेय सद्गुरुंच्या स्वरूपात आपल्यामध्ये मनुष्यदेहाच्या आश्रयाने वावरत असतात. त्यांची कृपा सर्वांवर होण्यासाठी त्यांच्या सिद्ध दत्तात्रेय वज्रकवच स्तोत्राचे १२०० पाठ, बीज मंत्राचा एक लाख पंचवीस हजार, दत्तगायत्री मंत्राचा एक लाख पंचवीस हजार व दत्तमाला मंत्राचा एक लाख पंचवीस हजार सबीज जप पूर्ण केला आहे. त्या प्रीत्यर्थ दशांश हवन या कालावधीत अकोला श्रीनाथशक्तिपीठात संपन्न होईल.

कार्तवीर्याऽर्जुनो नाम राजाबाहु सहस्रवान्।
तस्य स्मरणादेव हृतं नष्टं च लभ्यते।।

हरवलेली, चोरी गेलेली, विसरलेली वस्तु केवळ ज्याच्या मंत्राच्या पठनाने प्राप्त होते अशा तेजस्वी, अतुल पराक्रमी सिद्ध व दत्तात्रेयाचे प्रिय शिष्य असणाऱ्या कार्तवीर्याऽर्जुन स्तोत्राचे १२ हजार पाठ केल्याप्रीत्यर्थ हवन अकोला श्रीनाथशक्तिपीठात या कालावधीत संपन्न होईल.

ब्रह्मामुरारीस्त्रिपुरान्तकारी भानुः शशीभूमिसुतोबुधश्च।
गुरुश्च शुक्रः शनिराहू केतवः सर्वेग्रहाः शान्तिकरा भवन्तु।।



प्रत्येकाच्या जीवनांत नवग्रहाचे अतिशय महत्त्व आहे. जीवनातल्या प्रत्येक घटनांवर व प्रत्येक क्षणांवर ग्रहांचा अंमल आहे. जीवाच्या उत्कर्षासाठी ग्रहांची उपासना अतिशय लाभदायी आहे. प्रत्येकाच्या जन्मपत्रिकेत काही ग्रह चांगले, तर काही ग्रह त्रासदायक असतात. ग्रहांच्या वाईट परिणामांचे निरसन करण्यासाठी व योग्य परिणाम घडविण्याचे दृष्टीने नवग्रहांची संकल्पित उपासना, ग्रहांचे दान, यज्ञ आदी आवश्यक आहे.

सर्व ग्रहांचे वैशिष्ट्य आहे की, ते थोड्या कर्मानी संतुष्ट होतात. ग्रहांना त्यांच्या विशिष्ट वस्तूंचे दान अतिशय प्रिय आहे. हवनादी कर्माने लवकर सिद्धता येते. प्रत्येक ग्रहाचा सव्वा लाख जप अकोला श्रीनाथशक्तिपीठात झाला असून, त्याप्रीत्यर्थ दशांश हवन या कालावधीत होईल.

ह्याशिवाय नाथ परंपरेनुसार अकोला श्रीनाथशक्तिपीठात झालेल्या सूर्याच्या वैदिक मंत्र जपाप्रीत्यर्थ हवन या कालावधीत होईल.

मर्कटेश महोत्साह सर्वशोक विनाशक। शत्रूं संहर मां रक्ष श्रीयं दापय मे प्रभो।।



महारुद्र हनुमद्देवता ही युगानुयुगे चिरंजीव आहे. रामकार्यात धुरंधर असणारी ही देवता आज देखील आपल्या सामर्थ्यानिशी कार्यरत आहे.

अतिशय प्रखर तेज असणाऱ्या पंचमुखी वीर हनुमानाच्या कृपेने बल, बुद्धी, चातुर्य, सेवाभाव व भक्ती हे गुण साधकामध्ये प्रसूत होतात व बलभीमाच्या कृपेचे कवच लाभते.

अकोला श्रीनाथशक्तिपीठात हनुमान कवचाचे १२००० पाठ तसेच ऋग्वेदातील मन्युसूक्ताचे १२००० पाठ झाले असून, त्याप्रीत्यर्थ दशांश हवन या कालावधीत होणार आहे.

नाथांच्या छत्रछायेत पर्वणी आत्मोन्नतीची!

चतुर्वेद संहिता पारायण व स्वाहाकार

'संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम्। देवा भागं यथा पूर्वे सञ्जानाना उपासते।।'

वेद! संपूर्ण सृष्टीची निर्मिती, संचलन आणि नियंत्रण करतात. भारतमातेच्या परमोत्कर्षासाठी व परमवैभवासाठी आमचे बलशाली संघटन, परस्परांमधील सामंजस्य, बंधुभाव आणि एकता अक्षुण्ण राहो हा अपौरुषेय वेदांचा संदेश आहे. म्हणून अकोला श्रीनाथशक्तिपीठात विश्वशांती, विश्वकल्याणासाठी नाथपंथाच्या छत्रछायेत प्रत्येक जीवाच्या आत्मोन्नतीची पर्वणी साधण्यासाठी चतुर्वेद संहिता पारायण व स्वाहाकाराचे आयोजन दि. ६ ते १० जानेवारी, २०२७ या कालावधीत केले आहे. विदर्भात प्रथमच श्री राजराजेश्वर नगरी असलेल्या अकोल्यात ऋग्वेद, शुक्ल यजुर्वेद, कृष्ण यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद संहिता पारायण व स्वाहाकार संपन्न होत आहे. या दरम्यान चार वेदांचे भारतातील मूर्धन्य घनपाठी विद्वत्वृंद उपस्थित राहणार आहेत. बल, बुद्धी, चातुर्य, धनधान्य, संपत्ती, शारीरिक व मानसिक आरोग्य आदी गोष्टींचा लाभ होतो. जीवन सुखकर होते. शत्रू निष्प्रभ होतात. ही चतुर्वेद संहिता पारायण स्वाहाकार श्रवणाची फलश्रुती आहे.

ऋग्वेदाचार्य श्री. लक्ष्मीकांतशास्त्री वझुरकर, सावरगाव



महामहोपाध्याय ब्रह्मर्षी यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे गुरुजी यांचे पूर्ण कृपांकित शिष्य आहेत. गेल्या ४० वर्षापासून श्री चतुर्वेदेश्वर धाम, सावरगाव येथे ऋग्वेदाचे अध्यापन करीत आहेत. शेकडो विद्यार्थ्यांना ऋग्वेद दशग्रंथ, पद पाठ इत्यादी शिकविले आहे. त्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या पाठशाळा आहेत. भारतातील अनेक गणमान्य पुरस्कारांनी ते अलंकृत आहेत.

ऋग्वेदाचार्य श्री. गोपाळशास्त्री जोशी, घनपाठी, पुणे



गेल्या अनेक वर्षापासून पुणे येथे ऋग्वेदाचे अध्यापन करीत आहेत. शेकडो विद्यार्थ्यांना ऋग्वेद दशग्रंथासहित घनपाठ इत्यादी शिकविले आहे. केवळ १८ दिवसात ऋग्वेद घनपारायण करण्याचा विक्रम त्यांनी केला आहे. भारतातील अनेक गणमान्य पुरस्कारांनी ते अलंकृत आहेत.

- **वेदमूर्ती मयूर जोशी, घनपाठी, अध्यापक, द्वारका**
- **वेदमूर्ती राजेन्द्र पुरुषोत्तम दाणी, घनपाठी, अध्यापक, अहिल्यानगर**
- **वेदमूर्ती विक्रांत पांडे, घनपाठी, अध्यापक, नागपूर**
- **वेदमूर्ती सारंग शार्दुल, क्रमपाठी, अध्यापक, नाथ शक्तिपीठ, अकोला**

कृष्ण यजुर्वेद




वे.शा.सं. श्री. विवेकशास्त्री गोडबोले

महाराष्ट्र प्रांत प्रतिनिधी, श्रृंगेरी मठ

दक्षिणाम्नाय श्रीशृंगेरी शारदापीठम्चे महाराष्ट्र प्रतिनिधी म्हणून दायित्व असलेले श्री. विवेकशास्त्री गोडबोले, सातारा हे कृष्ण यजुर्वेद व सामवेद (गोवर्धनीय) शाखेचे प्रकांड पंडित आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून भारतात व विदेशातील २० हून अधिक देशात भ्रमण, तसेच वेदप्रचार-प्रसार कार्यासाठी अविरत परिश्रम करीत आहेत. अनेक विद्यार्थी घडविले आहेत. भारतातील अनेकविध पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

- **वेदमूर्ती श्यामसुंदर धर्माधिकारी, घनपाठी, अध्यापक, पुणे**
- **वेदमूर्ती धनंजय भिडे, पुणे**
- **वेदमूर्ती चैतन्य देशमुख, नांदेड**
- **वेदमूर्ती विश्वजीत कानडे**
- **वेदमूर्ती अथर्व जोशी,गंगाखेड**

शुक्ल यजुर्वेद



वेदमूर्ती श्री. निलेश केदार, माहूर

वेदभास्कर ब्रह्मर्षी श्रीकृष्णशास्त्री गोडसे, ब्रह्मर्षी विश्वनाथशास्त्री जोशी, न्यायचूडामणी पं.श्री.अशोक कुळकर्णी यांच्याकडे त्यांचे अध्ययन झाले आहे. संस्कृत काव्य-व्याकरण, स्मृतिपुराणांचे ते प्रकांड पंडित आहेत. प्रारंभी त्यांनी आळंदी येथे आध्यात्मिक प्रतिष्ठानात वेदाध्यापन केले. आज श्रीक्षेत्र माहूर येथे ते पं. श्री. अंबादास जोशी वेदाध्ययन ज्ञानपीठाचे संचालन करतात. अनेकविध बहुमान त्यांना आजवर प्राप्त झाले आहेत.

- **वेदमूर्ती अरविंद देशपांडे, अध्यापक, सावरगाव**
- **वेदमूर्ती शुभम उन्हाळे, अध्यापक, नाथ शक्तिपीठ, अकोला**
- **वेदमूर्ती वेदान्त मढदे, अध्यापक, माहुर**
- **वेदमूर्ती वेदान्त कपोले, जळगाव खानदेश**
- **वेदमूर्ती प्रशांत पाठक, अकोला**
- **वेदमूर्ती दिनेश जोशी, अध्यापक, कारंजा लाड**

सामवेद



अहिताग्नी वेदमूर्ती श्री. कृष्णशास्त्री पळसकर, नाशिक

कर्नाटक, होन्नावर येथे सामवेदाच्या 'राणायणीय' शाखेचे षडंगसमेत रहस्यांतम् घनान्त, सामवेद, एम.ए.चे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांनी ऋग्वेदीय याज्ञिकीचे अध्ययनही केले. महाराष्ट्रात सामवेदाच्या अध्यापनाची मुहूर्तमेढ त्यांनी रचली. ते सिंघल फाऊंडेशनच्या 'भारतात्मा', तसेच महाराष्ट्र शासनाच्या 'विद्वत् संस्कृत' पुरस्काराचे ते मानकरी आहेत. त्यांनी श्रौत व स्मार्त अग्निहोत्राची दीक्षा घेतली आहे. अनेक श्रौतयाग त्यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाले आहेत. सध्या ते नाशिक येथील दत्तधाम येथे वेदसेवारत आहेत. महामहोपाध्याय प.पू. श्री. यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे व प.पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर यांची विशेष कृपा त्यांना लाभली आहे.

- **वेदमूर्ती अतुल लक्ष्मणी सीतापती**
- **वेदमूर्ती दिनेश किरण पेडगांवकर**
- **वेदमूर्ती योगेश्वर शिवराम रामदासी**
- **वेदमूर्ती राघव शिवराम रामदासी,**
- **वेदमूर्ती अक्षय बाळासाहेब जोशी**

अथर्ववेद



वेदमूर्ती श्री. देशिक नारायण कस्तुरे, सावरगाव

महामहोपाध्याय ब्रह्मर्षी प.पू. श्री. यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांचे नातू आहेत. कर्नाटकाच्या गोकर्ण महाबळेश्वर येथील श्री. श्रीधरशास्त्री आढी यांच्याकडे अथर्ववेदाचे सांगोपांग अध्ययन केले आहे. आजघडीला ते महाराष्ट्रात ते अथर्ववेदाचे अग्रणी विद्वान मानले जातात.

भारतातील चारही पीठांच्या शंकराचार्यांकडून त्यांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा 'संस्कृत साधना' पुरस्कार २०२० साली प्रदान करण्यात आला. सध्या ते चतुर्वेदेश्वर धाम, सावरगाव या संस्थेचे अध्यक्ष आणि अथर्ववेदाचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

- **वेदमूर्ती योगानंद रमाकांत जोशी, रामपूरी**
- **वेदमूर्ती सचिन कुळकर्णी, नांदेड**
- **वेदमूर्ती किरण गोसावी, परभणी**
- **वेदमूर्ती दिनेश जोशी, पुणे**
- **वेदमूर्ती वेदांत जोशी, नांदेड**

उद्घाटन सोहळा

बुधवार, दि. ६ जानेवारी, २०२७, सायं. ६ वाजता

उत्सव मूर्ती



अध्यात्मयोगमहर्षी
प.पू.सद्गुरु श्रीनरेंद्रनाथ महाराज
नाथशक्तिपीठाधीश, अकोला



पूज्यपाद श्रीमद्जगद्गुरु
शंकराचार्य श्रीविद्यानृसिंहभारती
स्वामीमहाराज, करवीर पीठ



प.पू. आचार्य महामंडलेश्वर
श्रीमहंत सुधीरदासजी महाराज
नाशिक




प.पू. आचार्य श्रीश्री १००८
श्रीजितेंद्रनाथजी महाराज
देवनाथ पीठ, अंजनगाव



प.पू.योगी श्रीनिरंजननाथजी
महाराज, प्रमुख विश्वस्त
आळंदी देवाची



पद्मश्री प.पू.जनार्दनपंत बोथे
सचिव, गुरुदेव सेवा मंडळ
गुरुकुंज मोझरी



मा. न्या. संजय मेहरे
मुंबई उच्च न्यायालय;
सदस्य, समान नागरी संहिता
मसुदा समिती, महाराष्ट्र

नाथांच्या छत्रछायेत पर्वणी आत्मोन्नतीची!

उद्घाटन सोहळा

प्रमुख उपस्थिती

मा. ॲड. आकाशभाऊ फुंडकर
कामगार मंत्री तथा पालक मंत्री, अकोला, महाराष्ट्र राज्य

मा. अनुपजी धोत्रे
खासदार, अकोला

मा.श्री रणधीरजी सावरकर
आमदार, अकोला पूर्व

मा. श्री साजिद खान पठाण
आमदार, अकोला पश्चिम

मा. श्री वसंतजी खण्डेलवाल
आमदार, विधान परिषद

मा. श्री नितीनजी देशमुख
आमदार, बाळापूर

मा. श्री हरीशजी पिंपळे
आमदार, मूर्तिजापूर

मा.श्री प्रकाशजी भारसाकळे
आमदार, आकोट

मा. सौ. शारदाजी खेडकर
महापौर, अकोला

मा. श्री विजयजी अग्रवाल
सभापती स्थायी समिती

मा. सौ. वर्षाजी मीना, (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, अकोला

मा. डॉ. श्री सुनीलजी लहाने
आयुक्त, म.न.पा., अकोला

मा. श्री अर्चितजी चांडक (आय.पी.एस.)
जिल्हा पोलीस अधीक्षक, अकोला

मा. श्री प्रशांतजी जोशी
नगरसेवक, म.न.पा. अकोला

मा. श्री. निलेशजी देव
नगरसेवक, म.न.पा., अकोला

मा. कु. नीताताई जगताप
नगरसेविका, म.न.पा. अकोला

विशेष उपस्थिती-आशीर्वचन



विद्या विनय संपन्नं वीतरागं विवेकिनम् । वन्दे वेदान्त तत्त्वज्ञं विधुशेखर भारतीम् ।।

पूज्यपाद श्रीमद्जगद्गुरु शंकराचार्य दक्षिणाम्नाय श्री श्रृंगेरी शारदा पीठाधीश
श्री श्री श्री विधुशेखरभारती स्वामी महाराज

मां दियाळी संतांची



पूज्यपाद श्रीमद्जगद्गुरु
शंकराचार्य श्रीविद्यारण्यसरस्वती
स्वामीमहाराज, हम्पीपीठ,कर्नाटक




प.पू.श्रीमद्जगद्गुरु शंकराचार्य
श्रीअभिनवसच्चिदानंद विद्यानृसिंह
स्वामीमहाराज, संकेश्वरपीठ,कर्नाटक



पूज्यपाद श्रीमद्जगद्गुरु
शंकराचार्य श्रीशंकरभारती
स्वामीमहाराज, संकेश्वरपीठ,कर्नाटक




प.पू. केशवमहाराज नामदास
भक्तशिरोमणी नामदेव
महाराजांचे वंशज, पंढरपूर



वे.शा.सं.श्री उमेशमहाराज
टाकळीकर, गायत्री उपासक
दाजीमहाराज यांचे वंशज



प.पू. श्रीमोहननाथ
पैठणकर महाराज
नाथपीठ, देऊळगाव राजा



प.पू. श्रीशिवणगिरीकर महाराज
कान्होबा, वडोद
जि. छत्रपती संभाजीनगर



मा. भैयाजी जोशी,
पूर्व सरसहकार्यवाह
रा.स्व.संघ


मां दियाळी संतांची



मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. श्री. एकनाथजी शिंदे
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. श्री. नितीनजी गडकरी
रस्ते परिवहन राजमार्ग मंत्रालय,
भारत सरकार



प.पू.डॉ.बाबासाहेब तराणेकर
अ.भा. त्रिपदी परिवार
इंदोर



प.पू.श्री.सचिनदेवजी महाराज
भागवताचार्य,
अमरावती



प.पू. श्री. संजय महाराज पाचपोर
रामायणाचार्य,
अकोला



गुरुवर्य प.पू. तुकाराम महाराज
सखारामपूरकर,
इलोरा



प.पू.गुणवंत महाराज
शक्तिब्रह्माश्रम,
हिंगोली

मां दियाळी संतांची



धर्मभूषण प.पू. श्रीविजयकाका पोफळी महाराज, श्रीवासुदेव आश्रम, वाशिम



पू.पू. श्रीसुरेशजी ब्रह्मचारी महाराज, नीलकंठेश्वर महादेव संस्थान, उटी



प.पू.श्रीवसंतमामा दिढे नामालय आश्रम, खामगाव



प.पू.मंदाताई गंधे श्रीकृष्ण मंदिर, अमरावती



प.पू. आप्पामहाराज (दीनदास) प.पू.विष्णुदास महाराजांचे मानसपुत्र दत्तवाडी, तेल्हारा



प.पू. महंत १०८ कृष्णानंद भारतीजी महाराज, वारी भैरवी तथा ऋषिमहाराज संस्थान, सोनाळा पंचदशनाम जुना आखाडा, बडा हनुमान घाट वाराणसी



प.पू. श्री महंत शिवानंदपुरी महाराज सचिव, श्रीपंचदशनाम जुना आखाडा त्र्यंबकेश्वर, अंबादेवी संस्थान, मालखेड (रे.)



प.पू.सद्गुरु श्रीमोरेश्वरबुवा चन्होलीकर, शक्तिपातमहायोग दीक्षाधिकारी, श्रीहरिकीर्तनचक्रवर्ती

मेजवानी प्रबोधनाची



गुरुवार, दि. ७-१-२०२७ मार्गशीर्ष वद्य अमावस्या प्रवचन वे.शा.सं. विश्वासशास्त्री घोडसकर, नांदेड

शंकराचार्य मठ, सातारा येथे ऋग्वेद स्मार्त, साहित्य, न्यायशास्त्राचे अध्ययन. न्यायशास्त्र अभिज्ञ, शास्त्री, आचार्य या पदव्यांनी सन्मानित. अनंतश्री, विद्यावाचस्पती, न्यायभूषण या पुरस्कारांनी गौरवान्वित. श्रीदुर्गा पाठशाळा, प्राच्यविद्या प्रकल्प याचे संचालन करीत आहेत. रामायण, महाभारत, भागवत, योगवसिष्ठ, देवीभागवत व क्लिष्ट न्यायग्रंथांवर व्याख्याने, प्रवचने भारतभर करीत आहेत.



शुक्रवार, दि. ८-१-२०२७ पौष शु. प्रतिपदा प्रवचन ह.भ.प. श्री. अरविंद अमरसिंग राठोड, गुरुकुंज मोझरी

ग्रामगीताचार्य, संतसाहित्याचे गाढे अभ्यासक, सामुदायिक ध्यान, प्रार्थना, अध्यात्म आणि विज्ञान, राष्ट्र सर्वतोपरी या विषयांवर ते प्रबोधन करतात. त्यांनी एम.ए. (हिंदी, समाजशास्त्र), डी.एड., बी.एड. या पदव्या प्राप्त केल्या आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारधारेचा प्रसार-प्रचारार्थ देशविदेशात कार्यरत आहेत.



शनिवार, दि. ९-१-२०२७ पौष शु. द्वितीया वारकरी कीर्तन ह.भ.प. श्रीगुरु कान्होबा महाराज देहूकर, श्रीक्षेत्र पंढरपूर

वारकरी संप्रदायातील आदरणीय कीर्तनकार आहेत. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे ते १४ वे वंशज आहेत. शुद्ध वारकरी परंपरेच्या कीर्तनशैलीसाठी ते ओळखल्या जातात. संतांचे अभंग, भक्तिरस, अध्यात्म अतिशय सोप्या भाषेत जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ते कीर्तनातून अव्याहत करीत आहेत. संप्रदायातील त्यांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल त्यांचा कीर्तनस्वर्ण सोहळा नुकताच संपन्न झाला आहे.

मेजवानी प्रबोधनाची



रविवार, दि. १०-१-२०२७ पौष शु. तृतीया नारदीय कीर्तन ह.भ.प. श्री. मकरंदबुवा करंबेळकर, पुणे

नारदीय व वारकरी परंपरेनुसार अभ्यासपूर्ण रसाळ कीर्तनांसाठी ते ओळखल्या जातात. पुणे विद्यापीठातून इंग्रजी विषयात बी.ए., तर कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथून कीर्तनशास्त्रात एम.ए.ची पदवी संपादन केली आहे. समर्थ सेवामंडळ, सज्जनगड या संस्थेशी ते जुळले आहेत. समर्थ रामदासस्वामी, संत ज्ञानेश्वर, जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या विचारधारेचा ते प्रचार करतात.



सोमवार, दि. ११-१-२०२७ पौष शु. चतुर्थी वारकरी कीर्तन ह.भ.प. आचार्य अमृताश्रम स्वामीमहाराज, बीड

सुप्रसिद्ध आध्यात्मिक हिंदू धर्मगुरु, कीर्तनकार, प्रवचनकार, भागवतकार म्हणून संपूर्ण भारतवर्षात परिचित आहेत. अमोघ वाणी, गोड गाता गळा, नर्मविनोदी शैली यासाठी ते प्रसिद्ध आहेत. सनातन सत्पंथ संप्रदाय आणि वारकरी संप्रदायाच्या विचारसरणीतून देव, देश आणि धर्मासाठी ते अविरत कार्य करीत आहेत. छत्रपती श्री शिवाजीमहाराज त्यांचे आराध्य दैवत आहे.



मंगळवार, दि. १२-१-२०२७ पौष शु. पंचमी नारदीय कीर्तन ह.भ.प. डॉ. श्री.पुष्कर मधुसूदन गोसावी, श्रीक्षेत्र पैठण

शांतीब्रह्म श्रीसंत एकनाथ महाराजांचे ते चौदावे वंशज आहेत. महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या चळवळीतील प्रमुख अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ते सुपरिचित आहेत. पुणे विद्यापीठाची 'ज्योतिर्विद्या वाचस्पती' पदवी त्यांनी प्राप्त केली आहे. युवावर्गात ते परिपक्व व्याख्याता म्हणून लोकप्रिय आहेत. गरुडझेप फाऊंडेशनचा 'जीवनगौरव पुरस्कार', काव्यमित्राचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे.

मेजवानी प्रबोधनाची



बुधवार, दि. १३–१–२०२७ पौष शु. षष्ठी नारदीय कीर्तन वे.शा.सं.रामदासपंत आचार्य रामदासी, जालना

समर्थ सद्गुरु श्रीप्रल्हाद महाराजांचे शिष्य व मानसपुत्र आहेत. महामहोपाध्याय श्रीयज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांच्याकडे त्यांचे संस्कृतचे अध्ययन झाले आहे. प.पू. प्रल्हाद महाराजांच्या आज्ञेने १९८० पासून श्रीमद्भागवत सप्ताह, १९७३ पासून अध्यात्म रामायण पुराणसेवा अव्याहत सुरू आहे. एक हजारावर भागवत सप्ताह संपन्न झाले आहेत. रामदासी परंपरेच्या कीर्तनशैलीसाठी ते परिचित आहेत.



गुरुवार, दि. १४–१–२०२७ पौष शु. सप्तमी नारदीय कीर्तन ह.भ.प.डॉ.श्री. योगेश्वरमहाराज उपासनी, पुणे

आदित्य संप्रदायाचे अनुयायी व प्रचारक आहेत. कीर्तनक्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल 'कीर्तनभूषण' व 'राष्ट्रीय कीर्तनरत्न' या पुरस्कारांनी ते विभूषित आहेत. अभ्यासपूर्ण वक्तृत्वासाठी 'अक्षरयोगी' व 'विद्यावाचस्पती' ही पदवी त्यांना बहाल करण्यात आली आहे. राष्ट्रीय कीर्तनकार, शिवकथाकार आणि भागवताचार्य म्हणून ते ओळखल्या जातात.




शुक्रवार, दि. १५–१–२०२७ पौष शु. अष्टमी नारदीय कीर्तन ह.भ.प. डॉ. श्री.अजय नरहरीबुवा अपामार्जने, पुणे


गेल्या २७ वर्षांपासून आयुर्वेद पद्धतीने ते रुग्णचिकित्सा करतात. आठ पिढ्यांची कीर्तनपरंपरा त्यांना लाभली आहे. कीर्तनासाठी असलेल्या राष्ट्रीय प्रतिभा शोधयोजनेचे ते पहिले मानकरी व कीर्तनकुल घोषगीताचे हिंदी भावानुवादक आहेत. छोटा गंधर्व, गोविंदस्वामी आफळे, त्यागराज खाडीलकर आदी नामवंतांची त्यांनी साथ केली आहे. पुण्याच्या कीर्तन महाविद्यालयाचे संचालक आहेत.


सामूहिक ग्रंथ पारायण

ग्रंथ हे संतांचे अक्षरदेह असतात. ग्रंथांचे पारायण ही संतांची सेवा आहे. पारायण हा वाणीवर पावित्र्याचा संस्कार आहे. याद्वारे आपण संतांच्या विचारांशी जोडले जातो. अकोला श्रीनाथशक्तिपीठामध्ये श्रीनवनाथ भक्तिसार, श्रीगुरुचरित्र, ग्रंथ श्रीज्ञानेश्वरी, ग्रंथराज श्रीदासबोध या ग्रंथांचे सामूहिक पारायण आयोजिले आहे.









दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४.३०	जागरण
सकाळी ६.००	काकडा
सकाळी ७ ते ८	जलपान उपाहार
सकाळी ८.००	ग्रंथपारायण व स्वाहाकार
सकाळी ८.३०	स्वयंभू नागाश्वत्थ व औदुंबर वृक्षपूजन
सकाळी ९.३०	सौरपंचायतन यागास प्रारंभ
दुपारी १.००	महाआरती
दुपारी १.३०	महाप्रसाद
संध्या. ६ ते ९	कीर्तन – प्रवचन
रात्री ९.३०	महाप्रसाद
रात्री ११.००	दीपविसर्जन

संतपूजन

देव, देश व संस्कृतीसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या विभूतींचे अकोला श्रीनाथशक्तिपीठातर्फे अभिवादन!

- प.पू.श्रीगुणवंत महाराज, शक्तिब्रह्माश्रम, हिंगोली
- प.पू. श्रीगुरुदास गुरुमोरेश्वर महाराज रामदासी, संभाजीनगर
- प.पू. श्रीहरीमहाराज, माकोडी
- प.पू. श्रीयज्ञेश्वर महाराज जोशी, श्रीरेणुका दरबार, काचमंदिर, सोनई
- प.पू. श्रीअंबरीषमहाराज, हरिहरानंद महाराज, सोनई यांचे वंशज
- प.पू. श्रीअनिरुद्ध महाराज, हरिहरानंद महाराज, सोनई यांचे वंशज
- प.पू. श्रीपुरुषोत्तम महाराज कोरान्ने, श्रीबाबाजी मठ, अकोला
- प.पू.श्रीमंदारमहाराज देव, मोरया गोसावी संस्थान, चिंचवड
- प.पू. श्रीकल्याणमहाराज, संत सखाराम महाराज संस्थान, लोणी
- प.पू. श्रीअभयदादा खेर, प.पू. जनार्दनस्वामीमहाराज, बडोदा
- प.पू. श्रीअजेय विजयराव (सद्गुरुदास) देशमुख, गुरुमंदिर, नागपूर
- प.पू. वे.शा.सं.श्रीअण्णुमहाराज, चोळप्पास्वामींचे ५ वे वंशज, अक्कलकोट
- प.पू. श्रीमिलिंदस्वामी, प.पू. श्रीक्षीरसागर महाराजांचे वंशज
- प.पू. श्रीभाऊमहाराज देशपांडे, जाफराबाद
- प.पू. वेदमूर्ती अहिताग्नी श्रीकृष्णशास्त्री आर्वीकर, नागपूर
- प.पू. श्रीसागरशास्त्री शर्मा, एन.जे.टी. वेदपाठशाळा, नागपूर
- प.पू. वेदमूर्ती शांतारामजी भानुसे, नाशिक
- प.पू. वेदमूर्ती अहिताग्नी अभयशास्त्री पाठक, नाशिक
- प.पू. वेदमूर्ती अहिताग्नी दिनकरशास्त्री जोशी, नाशिक
- वेदमूर्ती श्रीबाळुगुरु आसोलेकर, भागवताचार्य त्रिधारा संस्थान, परभणी
- वेदमूर्ती श्रीश्रीराम धानोरकर, ब्रह्मानंद वेदपाठशाळा, संभाजीनगर
- वेदमूर्ती श्रीसुनीलगुरुजी कळगावकर, संभाजीनगर
- वेदमूर्ती रमाकांत जोशी, रामपुरी, बारा हनुमंताची
- वेदमूर्ती उद्धव वझूरकर, संभाजीनगर
- वेदमूर्ती पांडुरंग वझूरकर, अमरावती
- वेदमूर्ती मसादे महाराज, चंद्रपूर
- वेदमूर्ती सुधीर मोरेगावकर, परभणी
- वेदमूर्ती प्रभाकर पेडगावकर, नागपूर
- न्यायाचार्य श्री. प्रमोदशास्त्री कुळकर्णी, परभणी
- वेदमूर्ती सचिन जोशी, बीड
- प्रा. सुभाषजी लोहे, संतसाहित्य अध्यासन समूह, महाराष्ट्र प्रमुख, आष्टी
- श्री. यशवंत कुळकर्णी, अध्यक्ष, सद्गुरु ग्रुप, पुणे
- श्री. पवन जोशी, विप्र फाऊंडेशन, जालना
- विश्वस्तवृंद श्रीरेणुकामाता संस्थान, माहूर
- विश्वस्तवृंद श्रीतुळजाभवानी देवस्थान, तुळजापूर
- विश्वस्तवृंद श्रीमहालक्ष्मी संस्थान, कोल्हापूर
- विश्वस्तवृंद श्रीसप्तशृंगीमाता संस्थान, वणी (नाशिक)
- विश्वस्तवृंद श्रीयोगेश्वरीदेवी संस्थान, अंबाजोगाई

संतपूजन

- विश्वस्तवृंद श्रीमहाकाली संस्थान, चंद्रपूर
- विश्वस्तवृंद श्रीएकवीरा संस्थान, अमरावती
- विश्वस्तवृंद श्रीअंबादेवी संस्थान,अमरावती
- विश्वस्तवृंद श्रीतुळजाभवानी संस्थान, घोटा (हिंगोली)
- क्षेत्रोपाध्याय श्रीदत्तसंस्थान, गाणगापूर
- क्षेत्रोपाध्याय श्रीपादश्रीवल्लभ संस्थान, कुरवपूर
- विश्वस्तवृंद श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज संस्थान, कारंजा (लाड)
- विश्वस्तवृंद श्रीदत्तमंदिर संस्थान, नरसोबाची वाडी
- विश्वस्तवृंद श्रीदत्तमंदिर संस्थान, औदुंबरवाडी
- क्षेत्रोपाध्याय श्रीपादश्रीवल्लभ संस्थान, पीठापूर
- विश्वस्तवृंद श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ क्षेत्र, मायंबा
- विश्वस्तवृंद श्रीकानिफनाथ संस्थान, मढी
- विश्वस्तवृंद मूळ समाधी संस्थान, अक्कलकोट
- विश्वस्तवृंद श्रीसीताराम महाराज संस्थान, झिरी, बडनेरा
- विश्वस्तवृंद श्रीहेमराज दत्तमंदिर, हिंगोली
- ग्रामस्थ श्रीसीताराम महाराज संस्थान, रावराजूर
- विश्वस्तवृंद श्रीवासुदेव निवास, पुणे
- विश्वस्तवृंद श्रीविठ्ठल रुक्मिणी संस्थान, पंढरपूर
- विश्वस्तवृंद श्रीसंतगजानन महाराज संस्थान, शेगाव
- विश्वस्तवृंद श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी
- विश्वस्तवृंद श्रीशंकरमहाराज संस्थान, धनकवडी, पुणे
- विश्वस्तवृंद श्रीनामदेव महाराज संस्थान, नरसी नामदेव
- विश्वस्तवृंद श्रीसंतज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी देवाची
- विश्वस्तवृंद श्रीघृष्णेश्वर ज्योतिर्लिंग संस्थान, वेरूळ
- विश्वस्तवृंद श्रीनागनाथ ज्योतिर्लिंग संस्थान, औंढा
- विश्वस्तवृंद श्रीवैद्यनाथ ज्योतिर्लिंग संस्थान, परळी वैजनाथ
- विश्वस्तवृंद श्रीत्र्यंबकराज ज्योतिर्लिंग संस्थान, त्र्यंबकेश्वर
- विश्वस्तवृंद श्रीभीमाशंकर ज्योतिर्लिंग संस्थान, भीमाशंकर
- विश्वस्तवृंद श्रीशमीविघ्नेश गणेशमंदिर, श्रीआदासा
- विश्वस्तवृंद श्रीटेकडी गणपती मंदिर, नागपूर
- विश्वस्तवृंद श्रीचिंतामणी गणपती संस्थान, कखम, यवतमाळ
- विश्वस्तवृंद श्रीमहागणपती संस्थान, रांजणगाव
- विश्वस्तवृंद श्रीमयुरेश्वर गणपती संस्थान, मोरगाव
- विश्वस्तवृंद श्रीबल्लाळेश्वर गणपती संस्थान, पाली
- विश्वस्तवृंद श्रीसिद्धिविनायक गणपती संस्थान, सिद्धटेक
- विश्वस्तवृंद श्रीदक्षिणमुखी गणपती संस्थान, परळी वैजनाथ
- विश्वस्तवृंद श्रीमोरया गोसावी संस्थान, चिंचवड
- विश्वस्तवृंद श्रीदगडुशेठ हलवाई गणपती मंदिर, पुणे
- विश्वस्तवृंद श्रीसिद्धिविनायक मंदिर, मुंबई
- विश्वस्तवृंद श्रीवरदगणेश मंदिर, जालना
- विश्वस्तवृंद श्रीवरदगणेश सभा, संभाजीनगर
- विश्वस्तवृंद श्रीमाधवनाथ महाराज संस्थान,इंदौर

संतपूजन

- विश्वस्तवृंद श्रीमल्लिकार्जुन संस्थान, दिग्रस
- विश्वस्तवृंद श्रीकाळाराम मंदिर, नाशिक
- विश्वस्तवृंद श्रीसमर्थ राममंदिर, संभाजीनगर
- विश्वस्तवृंद ब्रह्मचैतन्य गोंदावलेकर महाराज संस्थान, गोंदावले
- विश्वस्तवृंद श्रीराममंदिर संस्थान, आनंदवाडी, जालना
- विश्वस्तवृंद श्रीगजानन महाराज संस्थान, बेतुरपाडा, कल्याण
- विश्वस्तवृंद श्रीदेवनाथ महाराज संस्थान, खामगाव
- विश्वस्तवृंद श्रीआगाशेकाका समाधी मंदिर (बरसाना), खामगाव
- विश्वस्तवृंद श्रीमुक्तेश्वरधाम आश्रम (पाचलेगावकर महाराज), खामगाव
- विश्वस्तवृंद श्रीसंत सखाराम महाराज संस्थान, लोणी
- विश्वस्तवृंद श्रीगोविंदरामानंद प्रल्हाद महाराज संस्थान, साखरखेर्डा
- विश्वस्तवृंद श्रीमुर्खाजी महाराज संस्थान, दुर्गवाडा, मूर्तिजापूर
- विश्वस्तवृंद श्रीबाळप्पा महाराज संस्थान, मूर्तिजापूर
- विश्वस्तवृंद श्रीनरसिंग महाराज संस्थान, आकोट
- विश्वस्तवृंद श्रीगजानन महाराज संस्थान, सजल विहीर, अकोली जहागीर
- विश्वस्तवृंद श्रीसंतगजानन महाराज पादुका संस्थान, मुंडगाव
- विश्वस्तवृंद श्रीसंत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था,आकोट
- विश्वस्तवृंद, बालाजी मंदिर, देऊळगाव राजा
- विश्वस्तवृंद श्रीबालाजी मंदिर संस्थान, मेहकर
- विश्वस्तवृंद श्रीबालाजी मंदिर संस्थान, वाशिम
- विश्वस्तवृंद श्रीनाथनंगे महाराज संस्थान, श्रीक्षेत्र डव्हा
- विश्वस्तवृंद श्रीसाईनाथ जन्मस्थान, पाथरी
- विश्वस्तवृंद श्रीचिंतामणी महाराज संस्थान, गुंज
- विश्वस्तवृंद श्रीनारायण महाराज संस्थान, भातकुली
- विश्वस्तवृंद श्रीकोंडेश्वर संस्थान, बडनेरा
- विश्वस्तवृंद श्रीराममंदिर, बडनेरा
- विश्वस्तवृंद श्रीबालाजी संस्थान, बडनेरा
- विश्वस्तवृंद श्रीसोनाजी महाराज संस्थान, सोनाळा
- विश्वस्तवृंद श्रीनृसिंह मंदिर, आकोट
- विश्वस्तवृंद श्रीकेशवराज मंदिर, आकोट
- विश्वस्तवृंद श्रीराम मंदिर, शनिपारा, आकोट
- विश्वस्तवृंद श्रीराममंदिर, पातूर नंदापूर
- विश्वस्तवृंद श्रीचंडिकादेवी संस्थान, कुरणखेड
- विश्वस्तवृंद श्रीआईनाथ संस्थान, उमरखेड
- विश्वस्तवृंद श्रीसाधुमहाराज खंदारकर संस्थान, उमरखेड
- विश्वस्तवृंद श्रीराजराजेश्वर संस्थान, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीदत्तमंदिर संस्थान, जुने शहर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीहरिहर मंदिर संस्थान, जुने शहर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीशनिमंदिर संस्थान, जुने शहर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीरेणुकादेवी मंदिर (अक्कलकोट), अकोला
- विश्वस्तवृंद श्रीविठ्ठलरखुमाई संस्थान, जुने शहर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीगजानन संस्थान, जुने शहर, अकोला

संतपूजन

- विश्वस्तवृंद श्रीशिवचरण महाराज मंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीसप्तशृंगी संस्थान, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीजागेश्वर संस्थान, जुने शहर अकोला
- विश्वस्तवृंद श्रीकाळामारोती संस्थान, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीज्ञानेश्वर मंदिर, जुने शहर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीसालासार बालाजी हनुमान मंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीरामदेवबाबा व श्रीखाटुश्याम मंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीअन्नपूर्णामाता मंदिर संस्थान, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीलक्ष्मीनारायण मंदिर संस्थान, जुने शहर,अकोला
- विश्वस्तवृंद श्रीमोठे राममंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीछोटे राममंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीराममंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीसिद्धिविनायक गणेश मंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीसंतगजानन महाराज मंदिर, मुकुंदनगर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीसंतगजानन महाराज मंदिर, गोरक्षण रोड, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीस्वामीसमर्थ मठ, देसाई प्लॉट, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीबाराज्योतिर्लिंग मंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीराणीसतीधाम, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीसमर्थमठ श्रीराममंदिर, दीपकचौक, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीकृष्ण गोरक्षण संस्थान, कानशिवणी
- विश्वस्तवृंद आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्प, म्हैसपूर
- विश्वस्तवृंद श्रीनाथदत्तमंदिर, रामदासपेठ, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीमुकुंदमंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीरूपनाथ महाराज संस्थान, दहिहांडा
- विश्वस्तवृंद श्रीअन्नपूर्णामाता मंदिर, मूर्तिजापूर
- विश्वस्तवृंद श्रीतपेहनुमान मंदिर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीगणेशमंदिर, गायगाव
- विश्वस्तवृंद श्रीनाथगणेश मंदिर, न्यू तापडिया नगर, अकोला
- विश्वस्तवृंद श्रीरेणुकामाता मंदिर, डाबकीरोड, अकोला
- श्रीप्रल्हाद महाराज उपासना मंडळ, डाबकी रोड
- श्रीप्रल्हाद महाराज उपासना मंडळ, जठारपेठ
- श्रीप्रल्हाद महाराज उपासना मंडळ, निवारा कॉलनी
- श्रीजगदंब परिवार, अकोला
- त्रिपदी परिवार, अकोला
- ब्रह्मर्षी दत्तमहाराज कवीश्वर शिष्यपरिवार, अकोला
- श्रीविष्णुदास महाराज उपासना मंडळ, अकोला
- श्रीनाथसखा उपासना मंडळ, अकोला
- श्रीगुरुचरित्र पारायण मंडळ, अकोला
- श्रीसमर्थ उपासना मंडळ, हिंगोली
- श्रीसंत भटजीबापूमहाराज संस्थान,हैद्राबाद

स्वागत समिती

स्वागताध्यक्ष	कार्याध्यक्ष	सचिव	कोषाध्यक्ष
मा.न्यायमूर्ती श्री. संजय मेहरे	**सी.ए. श्री. अनिरुद्ध चौधरी**	**प्राचार्य श्री. गजानन कुळकर्णी**	**डॉ. श्रीकांतशास्त्री गदाधर**
संपर्कप्रमुख	व्यवस्थाप्रमुख	प्रसार-प्रचार प्रमुख	प्रसिद्धी प्रमुख
श्री.संतोष जोशी, श्री दिनेश जोशी	**श्री. मंगेश फडणवीस**	**श्री.महेंद्र कवीश्वर, श्री. अविनाश परळीकर**	**श्री.विजय केंदरकर**

समिती सदस्य - श्री. रामेश्वरजी फुंडकर, श्री. प्रशांत जोशी, श्री.निलेश देव, कु.नीताताई जगताप, श्री. प्रकाश रेड्डी, सीए श्री. अनिल पिंपरखेडे, सीए मारुती भोयर (वाशिम), डॉ.श्री. अभय पाटील, श्री. प्रदीप नंद, डॉ. तुषार शुक्ल, श्री.जयंत पडगिलवार, श्री. श्रीकांत पडगिलवार, ॲड.श्री.मोहनराव आसरकर (आकोट), श्री. प्रकाशराव वाघमारे, श्री. जैनेंद्रजी लुंकड, श्री. विनय वारे (मूर्तिजापूर), श्री. सुहास गद्रे, डॉ. मिलिंद पांडे (एमआयटी, पुणे), श्री. अद्वैत जोशी (युएसए), श्री. अभिजित पाटील (योकोहामा, जपान), श्री. हरीश पाटील (बेल्जियम), डॉ. श्री. अभिजित नालट, श्री. किरण मोरगावकर, डॉ. श्री. सुधीर कांडेकर, डॉ. श्री. श्यामकुमार हांडे, श्री.तुषार जयस्वाल (वणी), प्रा. मोहन गद्रे, डॉ.अनंत श्रावगी, ॲड. श्री. प्रमोद जोशी (अमरावती), डॉ. पुरुषोत्तम जोशी (नागपूर), डॉ. श्री. सुनील जोशी (नागपूर), डॉ. श्रीनिधी गुरु (नागपूर), श्री. भाऊसाहेब मारोडकर (यवतमाळ), डॉ. श्री. योगेश राठोड (संभाजीनगर), श्री. अशोक थोरात (संभाजीनगर), श्री. संजय नागरे (जालना), श्री. रवींद्र जोशी (दादर), श्री. गणेश खैरनार (कल्याण), ॲड.श्री. मनोज मुळे (पनवेल), श्री. शार्दुल दिगंबर, श्री. दिलीप देशपांडे (मलकापूर), श्री. केदार गोवंडे (पुणे), श्री. श्रीकृष्ण गायकवाड (पुणे), प्रा. श्री. निनाद कुळकर्णी, श्री. रितेश खोत, सौ. अलका जोशी, श्री. प्रभाकर देशपांडे, श्री. नितीन कुळकर्णी, श्री. अतुल गोंधळेकर, श्री. अविनाश देशपांडे, श्री. शंकर धामोडे, श्री. संदीप काळे, श्री. किरण बोपटे (आपातापा), श्री. नाना कुळकर्णी, श्री. सुनील हातेकर, श्री. अजय गुर्जर, श्री. सुरेश पाटील, श्री.रवी काकडे (दुर्गवाडा), श्री.गौरव कावरे (दुर्गवाडा), श्री. वामनराव जकाते (आकोट), श्री. नितीन रेलकर, श्री. संदीप पत्की, श्री. सौरभ जोशी (मुंबई), श्री. महेशभाई कदम (पुणे), श्री.विवेक जोशी (पुणे), श्री. अनंत पाटील (पुणे), डॉ. श्री. सतीश चापडगावकर (नाशिक), श्री. रवींद्र चिंतामणी (परळी वैजनाथ), श्री. राजेंद्र पटवर्धन (पुणे), श्री.स्वानंद भावे (पुणे), श्री.अभिजित आळशी, डॉ. श्री. सचिन धर्माधिकारी, प्रा. श्री. अविनाश नानोटी, श्री. रत्नाकर आसोलेकर (परभणी), श्री. हृषिकेश आसोलेकर (वसमत), श्री. प्रवीण जोशी, श्री.लक्ष्मण दाती, श्री. श्री.प्रसाद जोशी, श्री. प्रदीप ठाकूर, श्री. मंदार चानकर (नागपूर), श्री. कुणाल झामरे, डॉ. श्री. कुलदीप देशपांडे, डॉ. श्री. प्रवीण चव्हाण, श्री. प्रदीप कुळकर्णी, श्री. उदय महा, श्री. निशिकांत पुजारी, डॉ. श्री. सुनील घिरणीकर, श्री. केशव मोहरील, श्री. दिलीप पांडे, डॉ. सौ. कीर्ती जोशी, सौ. राजेश्वरी गायकवाड, सौ. शुचिता जोशी, सौ.विदुला चौधरी, डॉ. सौ. वर्षा सुखदेवे, सौ. दीप्ती गदाधर, सौ.तृप्ती आसोलेकर, सौ. भाग्यश्री चानकर (नागपूर), डॉ. सौ. स्नेहा गोडबोले (ठाणे), सौ. अपूर्वा देशपांडे (बंगलोर), सौ. अदिती देशपांडे, सौ.आशा खोकले, श्रीमती चंदाताई जयस्वाल, डॉ. सौ. शिल्पा चव्हाण, सौ.वैशाली बुट्टे–पाटील (पुणे), सौ. दीपाली जोशी (पुणे), सौ. पल्लवी कुळकर्णी, सौ. अवंतिका मैराळ, डॉ. सौ. जयश्री जोशी, सौ. वैशाली भागवत (जालना), सौ. आरती कुळकर्णी (जालना), सौ. शरयू कुळकर्णी (जालना), सौ. माधवी फडणवीस (नागपूर), सौ. सुलभा थोरात (संभाजीनगर), श्री. मंगेश पारगावकर (पुणे), श्री. निलेश आळशी (पुणे), श्री. गणेश आळशी (पुणे), श्री.अनिरुद्ध पळसकर (संभाजीनगर) श्री. सागर पळसकर (संभाजीनगर), श्री. पंकज कुळकर्णी (संभाजीनगर), श्री.संकेत जोशी (संभाजीनगर), श्री.नितीश चानकर

(पुणे), श्री.निखिल चानकर (पुणे), भागवताचार्य श्री. सुधीर कोठीकर (जालना), श्री. अमोल बाणेगावकर (जालना), श्री. शुभम् भागवत (जालना), श्री. आकाश क्षीरसागर (जालना), श्री. गिरीश मालखरे (नागपूर), श्री. आशिष भालेराव (नागपूर), श्री. नचिकेत काळे (नागपूर), श्री.अमेय पिंपळापुरे (नागपूर), श्री.सुहास कुळकर्णी, श्री. सतीश पिंपळे, श्री. प्रसाद गंधे (नागपूर), श्री.आकाश कुळकर्णी (नागपूर), श्री. राहुल धोंड (नागपूर), श्री. विनायक जोशी (नागपूर), श्री. कपिल जोशी (लातूर), श्री. शुभम् जोशी (गंगाखेड), श्री. सचिन पाठक (बदलापूर), श्री.महेश भोरे (बदलापूर), श्री. अमित कुळकर्णी, श्री. गणेश निंबोळे, श्री.अनंत मारोडकर (नागपूर), श्री. गिरीश देव (रायपूर), श्री. गजानन जोशी, श्री.निलेश काळे, श्री. लीलाधर चिटणवीस, श्री. विशाल जवादे, श्री. अनंत नरसापूरकर (नागपूर), श्री. आलोक आंबेकर (नागपूर), प्रा. सौ. मीना मोरोणे (नागपूर), श्री. निलेश जोशी (पुणे), डॉ. सौ. वृषाली देशपांडे (बंगळुरू), श्री. विजय पाटील (पुणे), श्री. संदीप वाळके (पुणे), सुश्री मंजुषा भाभे (ठाणे), श्री. मोहन देव (नागपूर), श्री. आशुतोष शेंडे (परभणी), श्री. कृष्णा देशपांडे (नांदेड), श्री. अक्षय कानोले (नांदेड), श्री. स्वप्निल मोहरील (बुलढाणा), श्री. विशाल पाठक (बऱ्हाणपूर), श्री. गौरव नेटके (बऱ्हाणपूर), श्री. धीरज जोशी (पुणे), श्री. अनंतविजय भालेराव (अमरावती), श्री. श्यामराव खानझोडे (बडनेरा), श्री. विवेक पांडे (बडनेरा), श्री. गजानन देशमुख (बंगलोर), सौ. पूजा फडके (युएसए), श्री.ईशान गायकवाड (युएसए), श्री. मिलिंद सभापतीकर, समस्त गुरुबंधू परिवार

मंडप व्यवस्था	ध्वनि व प्रकाशव्यवस्था	भोजन व्यवस्था
श्री. रूपेश रुईकर	श्री. सागर चौधरी	श्री. अशोक शर्मा (मेहकर)
श्री. पवन ढोरे	श्रीगाडगेबाबा डेकोरेशन अँड साऊंड	श्री. जीवन शर्मा (मेहकर)

'पर्वणी आत्मोन्नतीची' या आयोजनात आपण असे सहभागी होऊ शकता!

१. वेदसंहिता पारायण व स्वाहाकाराचे यजमानपद २. दैनंदिन हवनाचे यजमानपद ३. दैनंदिन अन्नदानातील सहभाग ४. दैनंदिन पूजासामग्रीचे यजमानपद
५. यतिपूजन व संतपूजनाचे यजमानपद ६. कीर्तन महाआरतीचे यजमानपद ७. विविध प्रकारच्या तुलांचे यजमानपद ८. जलपान सेवेचे यजमानपद

सहभागासाठी संपर्क

डॉ. श्रीकांतशास्त्री गदाधर	सी.ए. अनिरुद्ध चौधरी	प्रा. गजानन कुळकर्णी
मो. ९८२२३६१९३१	मो. ९९२२९६१९३१	मो. ९७६७०७६९७६
रवीशास्त्री आसोलेकर	संतोष जोशी	श्रीनाथशक्तिपीठ, अकोला
मो. ९८२२७७८९३१	मो. ९८१९५७९३९१	मो. ९१३००८०९३१